महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

दूरध्वनी क्र २२८२६५७०    Email ID : desk8-gad@mah.gov.in

---

क्र.मलोआ-११२४/प्र.क्र.२६६/म.लो.आ.    दिनांक: ३० डिसेंबर, २०२४

प्रति,

संचालक,
माहिती व तंत्रज्ञान विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.

विषय- महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या सदस्यांची ३ पदेभरण्याबाबतची जाहिरात वृत्तपत्रात प्रसिध्द करण्याबाबत.

महोदय,

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या सदस्यांची ३ पदे भरण्याबाबतच्या जाहिरातीचा मराठी व इंग्रजी भाषेतील नमूना सोबत जोडला आहे. सदर जाहिरात संक्षीप्त स्वरुपात वृत्तपत्रात प्रसिध्द होणार आहे. वृत्तपत्रात सदर जाहिरातीबाबतचा तपशिल शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर पहा असे नमूद केले आहे. सदर जाहिरातीचा तपशिल शासनाच्या www.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर दिनांक ३१.१२.२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात यावा, ही विनंती.

(स्मिता जोशी)
अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग,
महाराष्ट्र शासन

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातील सदस्यांची ३ पदे भरण्यासाठी अर्ज मागविण्यासाठीची जाहिरात

क्र.मलोआ-११२४/प्र.क्र.२६६/म.लो.आ. जाहिरात क्रमांक १/२०२४

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या सदस्यांची (सदस्यास दरमहा अनुज्ञेय वेतन रु.२,०१,३००/-) ३ पदे भरावयाची आहेत. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष व सदस्य यांच्या नियुक्तीची मार्गदर्शक तत्वे निश्चित करणारा दिनांक ११.०९.२०१९ चा शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. **सदर शासन निर्णयातील मार्गदर्शक तत्व क्र. २ (क),(ड) व (इ) मध्ये नमूद केलेली सदस्य पदासाठीची अर्हता पूर्ण करीत असलेल्या तसेच अर्ज सादर करावयाच्या अंतिम दिनांकास ५० वर्षे पूर्ण झाली आहेत अशा इच्छूक उमेदवारांकडून** अर्ज मागविण्यात येत आहेत. इच्छूक उमेदवारांनी दि.११.०९.२०१९ च्या शासन निर्णयासोबतच्या **जोडपत्र-अ मधील विहित नमून्यामध्ये** (आवश्यक त्या कागदपत्रांच्या तसेच १० वर्षाचे गोपनीय अहवाल/मुल्यांकन अहवालाच्या छायांकीत प्रतीसह) **आपले अर्ज दिनांक १७ जानेवारी, २०२५ पर्यंत** प्रत्यक्ष/कुरिअर/स्पीडपोस्ट किंवा नोंदणीकृत डाकेने, सह सचिव, कार्या-८, सामान्य प्रशासन विभाग, सातवा मजला, (विस्तारित इमारत) मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई: ४०० ०३२ यांच्या नावे सादर करणे आवश्यक आहे. विहित मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

ठिकाण : मुंबई
दिनांक : ३०.१२.२०२४

(गीता कुलकर्णी)
सह सचिव, सामान्य प्रशासन विभाग,
महाराष्ट्र शासन

E:\SACHIN RANE\2024\MPSC\Member\म.लो.आ. सदस्यांच्या 3 पदासाठी जाहिरात 2024.docx

**Government of Maharashtra**
**General Administration Department**

**An Advertisement for filling up 3 posts of member of the Maharashtra Public Service Commission**

No.MPSC-1124/C.R.266/MPSC — Advertisement No. : 1/2024

It is proposed to fill up 3 posts of member of the Maharashtra Public Service Commission drawing a consolidated pay/salary of Rs.2,01,300/- per month. The Guiding Principles regarding appointment of the Chairman and Members of the Maharashtra Public Service Commission have been prescribed vide Government Resolution, General Administration Department dated 11.09.2019. This Government Resolution is available on the website (www.maharashtra.gov.in) of the Government of Maharashtra. Applications are invited from the aspiring candidates who have attained the age of 50 years on the prescribed last date of submission of application as well as fulfilling the eligibility for the post of member of the Maharashtra Public Service Commission as specified in Guiding Principle number 2 (c), (d) and (e). Aspiring candidates shall submit their applications in a prescribed format in Annexure-A of the said Government Resolution along with attested copies of requisite documents (along with required documents and 10 years Confidential Reports/Appraisal Report) to the Joint Secretary, Desk-MPSC, 7th Floor, (Extension Building), General Administration Department, Hutatma Rajguru Chowk, Madam Cama Road, Mantralaya, Mumbai – 400 032 by 17th January, 2025 by hand delivery/ Courier/ Speed Post or Registered Post. The applications received after due date shall not be entertained.

Place : Mumbai
Date : 30th December, 2024

(Geeta Kulkarni)
Joint Secretary
General Administration Department,
Government of Maharashtra

E:\SACHIN RANE\2024\MPSC Member\म.लो.आ. सदस्यांच्या 3 पदासाठी जाहिरात 2024.docx